| MHST080001582015 | रे. दि. मु. क्रमांक ३८/२०१५ मधील नि. क्र. ५३ खालील आदेश. |
|---|---|
| | श्रीमती जुबेदाबी आल्लाबक्ष नायकवडी विरुध्द सैफिद्दीन मुल्ला वगैरे |
| | (आदेश पारित दिनांक १५.०२.२०२४) |

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ तर्फे निशाणी ३१ वर झालेला उलट तपासणी नाही हा हुकूम रद्द होवून उलट तपास घेण्यास परवानगी मिळावी तसेच वादींतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांचे ही उलट तपास घेण्यासाठी परवानगीसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, सदरकामी वादीतर्फे निशाणी ३१ ला सरतपासाचे अॅफिडेव्हीट दिलेले आहे. तसेच वादीतर्फे साक्षीदार तपासण्यात आले आहेत व निशाणी ५० ला मोजणीदारांची साक्ष नोंदविलेले आहेत. सदर कामातील प्रतिवादी हा व्यवसायानिमित्त पुणे येथे कायमस्वरुपी राहत आहेत. तसेच कोविड प्रतिबंध असताना वादीने जबाब दिलेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी यास जबाबाची माहिती नव्हती व नाही. तसेच प्रतिवादीतर्फे साक्षीदारांचे जबाबही नोंदविणेत आलेले आहेत. या कामी प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेता आलेला नाही. वादीस वर दिलेल्या संयुक्तीक कारणांमुळे जबाबाबाबत माहिती नव्हती. तरी वादी व वादीचे साक्षीदारांचे उलट तपास घेणे अंतिम न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. जर उलट तपासणी घेण्याची संधी दिली नाहीतर प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब , निशाणी ३१ वर झालेला उलट तपासणी नाही हा हुकूम रद्द होवून उलट तपास घेण्यास परवानगी मिळावी तसेच वादीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांचे ही उलट तपास घेण्यासाठी परवानगी द्यावी अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

०३. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे निशाणी क्र. ५४ वर दाखल केले आहे. वादीनुसार, प्रतिवादींचा अर्ज व त्यामधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून तो या वादी यांना मान्य व कबूल नाही. सदरकामी वादीने स्वतःचा जबाब निशाणी ३१ ला दिनांक १३/०३/२०२० रोजी तपासले आहे त्याची प्रत प्रतिवादी नं. २ ला दिनांक

१२/१०/२०२० रोजी दिलेली आहे. वादीने साक्षीदार नितीन दिनकरराव देशमुख व राऊ बाळासो यांची जबाब नोंदविला त्यावर दिनांक २१/०३/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश झाला. श्री नईम ईसाक पटेल यांचे जबाबावर दिनांक ३०/०३/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश झाला तर भूकरमापक श्री आर.टी. गंभीरे यांचा दिनांक ०३/०७/२०२३ रोजी जबाब नोंदविलेला आहे. देशामध्ये कोरोना महामारीचा प्रादुर्भावानंतर सप्टेंबर २०२१ पासून न्यायालयीन कामकाज सुरळीत सुरु चालू झाले आहे. प्रतिवादीला वादीचे जबाबाची नक्कल दिनांक १२/१०/२०२० रोजी देणेत आली आहे व ते पाहता वादीने कोरोना प्रादुर्भाव चालू होणेपूर्वी १३/०३/२०२० रोजी जबाब नोंदविलेला आहे व कोरोना संपलेनंतर प्रतिवादीला प्रत दिली आहे व त्यानंतर निशाणी ३१ वर वादीचा उलटतपास प्रतिवादीने घेतला नाही असा हुकूम दिनांक २६/०२/२०२१ रोजी झाला आहे. त्यानंतर प्रतिवादी नं. २ हा कोर्टात् दिनांक १६/०३/२०२१ रोजी मे.कोर्टात हजर आहे असे रोजनाम्यावरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यावेळीही प्रतिवादी याला सदर आदेशाची माहिती झालेली आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक हेतुतः उलटतपास घेणेस टाळाटाळ केलेली आहे.

०४. वादीनुसार, प्रतिवादी क्र. २ हे प्रतिवादी क्र. १ चे हस्त वादीला नाहक त्रास देत आहे व दाव्याचे कामकाज लांबवून वादीला न्यायापासून वंचीत ठेवणेचा प्रयत्न करीत आहे. वादी ही वयस्कर महिला आहे. सन २०१५ पासून न्याय मिळणेसाठी कोर्टात प्रत्येक तारखेला हजर आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीचा अर्ज मंजूर झालेस वादीस न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे. वादी ही गरीत सेवानिवृत्त महिला असून वादीला कोणाचाही आधार नाही याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. २ हा प्रतिवादी क्र. १ ला वादीचे मिळकतीत घुसणेचा प्रयत्न करत आहेत. प्रतिवादी क्र. २ चा वादीचे खरेदी क्षेत्राशी काहीही संबंध राहिलेला नाही. प्रतिवादी याला कायद्याचे कोर्ट प्रोसिजरचे ज्ञान आहे. वादीचा पुरावा चालू झालेची माहिती प्रतिवादीला दिनांक १२/१०/२०२० पासून आहे. त्यानंतरही प्रतिवादी काही तारखांना कोर्टात हजरही झालेला आहे त्यामुळे प्रतिवादीचे अर्जातील कारण खरे नाही. येणेप्रमाणे नमूद सर्व मुद्दयांचा व युक्तिवादावेळी उपस्थितीत होणारे सर्व मुद्दयांचा विचार होवून प्रतिवादी क्र. २ चा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

०५. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद अचल संपत्तीबाबत असल्यामुळे संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे सदर दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देण्याच्या दृष्टीने योग्य वाटते. प्रतिवादी यांना वादी व साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी दिल्यास ते न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे व प्रस्तुत दाव्याचा गुणावगुणावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. तसेच उलटतपास प्रतिवादी यांनी घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व प्रतिवादी यांना दाव्याचे कामी आपला बचाव मांडता येणार आहे. परंतु प्रतिवादीच्या विलंबामुळे सदरचा दावा हा लांबणीवर पडला असल्यामुळे प्रतिवादी यांचेवर योग्य ती कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

आदेश

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. ५३ चा अर्ज १०००/- चे कॉस्ट वर मंजूर करणेत येतो. |
| २. | प्रतिवादी यांनी कॉस्ट भरलेनंतर प्रतिवादी यांना निशाणी ३१ वर झालेला उलट तपासणी नाही हा हुकूम रद्द होवून उलट तपासणी घेता येइल तसेच वादीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांचेही उलटतपास घेता येतील. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

Sd/-
(के. ए. पट्टेबहादुर)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- १५.०२.२०२४

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – सौ. सुवर्णा संकेत शिंदे

Sd/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेख (ग्रेड – ३)